आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२३ जानेवारी २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येतील अशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

- नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९व्या जयंतीनिमित्त देशाचं अभिवादन

- सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन वैयक्तिक पुरस्कारासाठी यंदा लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांची निवड

- एल्गार परिषद प्रकरणी दोन आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

**आणि**

- रणजी क्रिकेट स्पर्धेत हैद्राबादविरुद्ध मुंबईचा ५६० धावांचा डोंगर/ सर्फराज खानचं द्विशतक

**<><><><><>**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रम होत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. बाळासाहेबांचं जनतेशी अनोखं नातं होतं, विविध मुद्द्यांवर ते आपली मतं निडरपणे व्यक्त करत असत, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाजमाध्यमांवर बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. हे वर्ष बाळासाहेब ठाकरे यांचं जन्मशताब्दी वर्ष असून त्यानिमित्त विविध लोकाभिमुख उपक्रम राबवण्यात येतील असं शिंदे यांनी यावेळी आयोजित वार्ताहर परिषदेत सांगितलं….. मुंबई महानगरपालिकेतर्फे आरोग्य आपल्या दारी ही मोहीम ठाकरे जन्मशताब्दीनिमित्त राबवण्याची घोषणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

**- - - -होल्ड- बाईट- शिंदे - - -**

गड किल्ल्याची स्वच्छता, संवर्धन यासाठी स्वयंसेवी संस्थांना मानधन देण्यात येईल, शाळांचा दर्जा वाढवण्यासाठी स्पर्धा घेऊन  विशेष पारितोषिक दिलं जाईल, महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी अनुदान अशा विविध योजनांची माहिती त्यांनी दिली.

या संदर्भातल्या लोककल्याणकारी योजनांचा कृती आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसहून परतल्यावर एकत्रितपणे जाहीर करु असं ते म्हणाले.

शिवसेना उद्धव  बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांनी आज दक्षिण मुंबईतल्या  ठाकरे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी शिवसेनेचे आजी माजी  नेते आणि कार्यकर्ते उपस्थित  होते.

**<><><><><>**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जयंतीनिमित्त देश त्यांना आदरांजली वाहत आहे.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन,  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनीही नेताजींना श्रद्धांजली वाहिली आहे.

मुंबईत राज्यपालांचं निवासस्थान महाराष्ट्र लोक भवन इथेही नेताजी सुभाष चंद्र बोस यांना आदरांजली वाहण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस यांना समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन वैयक्तिक पुरस्कारासाठी यंदा लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांची निवड झाली आहे. केरळमधे वायनाड इथं २०२४ मधे भूस्खलनामुळे ओढवलेल्या आपत्तीत शेळके यांनी अभियांत्रिकी कौशल्याच्या सहाय्याने बचाव कार्यात लक्षणीय योगदान दिलं होतं. मूळच्या अहिल्यानगरच्या सीता शेळके भारतीय सैन्याच्या मद्रास अभियांत्रिकी आस्थापनेत कार्यरत आहेत. ५ लाख रुपये आणि मानपत्र असं पुरस्काराचं स्वरुप आहे. संस्थांसाठीचा ५१ लाख रुपयांचा पुरस्कार यंदा सिक्किम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला देण्यात येणार आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी २५ जानेवारीला सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३०वा भाग असेल.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केरळमध्ये विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. रेल्वे जोडणी, शहरी रोजगार, विज्ञान-तंत्रज्ञान, नागरिककेंद्री सेवा आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधांशी संबंधित प्रकल्पांचा यात समावेश आहे. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केलं आणि केंद्र सरकारनं गेल्या ११ वर्षांमध्ये विविध समाजघटकांसाठी सुरू केलेल्या योजनांचा उल्लेख केला. यावेळी तीन अमृत भारत रेल्वेगाड्या आणि एका प्रवासी रेल्वेला प्रधानमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवला. तसंच पीएम स्वनिधी क्रेडिट कार्ड्सचं अनावरण आणि एक लाख फेरीवाल्यांना पीएम स्वनिधी कर्जांचं वाटपही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी भव्य रोडशो केला.

<><><><>

एल्गार परिषद नक्षलवादी संबंध प्रकरणातले आरोपी सागर गोरखे आणि रमेश गायचोर यांना मुंबई उच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला आहे. मोठा काळ तुरुंगवास आणि या प्रकरणाची सुनावणी लवकर सुरू होण्याची शक्यता नसल्याच्या आधारावर या प्रकरणातल्या इतर आरोपींना जामीन दिल्याचं न्यायालयानं सांगितलं.

<><><><>

चंद्रपूर जिल्ह्यातल्या ताडोबा अंधेरी व्याघ्र प्रकल्पातले प्रस्तावित खाणकाम प्रकल्प रद्द करावेत, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. या प्रकल्पांमुळे निसर्गाचं अपरिमित नुकसान होईल, असं त्यांनी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. या प्रकल्पांमुळे जंगल आणि वन्यजीवांना मोठा धोका निर्माण होईल, असंही ठाकरे यांनी म्हटलं आहे.

<><><><>

गोवा नाईट क्लब आग प्रकरणी त्या क्लबच्या मालकांविरुद्ध आर्थिक गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल केल्यावर सक्तवसुली संचालनालयानं आज गोवा, दिल्ली आणि हरियाणात

छापे टाकले. क्लबचे मालक सौरभ आणि गौरव लूथरा आणि सहमालक अजय गुप्ता यांची कार्यालयं आणि घरं, तसंच गोव्यातल्या अरपोरा गावाचे सरपंच रोशन रेडकर आणि पंचायत सचिव रघुवीर बागर यांची कार्यालयं आणि घरांमध्ये ईडीनं झडती घेतली. डिसेंबर महिन्यात या नाईट क्लबमध्ये आग लागून २५ जणांचा मृत्यू झाला होता. क्लबच्या मालकांपैकी एक असलेला ब्रिटिश नागरिक सुरिंदर कुमार खोसला याच्या घरीही ईडीचे अधिकारी हजर होते.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात काल ड गटात हैदराबाद इथं सुरु झालेल्या, हैदराबादविरुद्धच्या सामन्यात, आज दुसऱ्या दिवशी मुंबईचा पहिला डाव ५६० धावांवर संपला. कालच्या ४ बाद ३३२ धावांवरुन आज पुढं खेळताना शतकवीर सर्फराज खाननं द्विशतक पूर्ण केलं. २२९ चेंडूत २२७ धावा करताना त्यानं १९ चौकार आणि ९ षटकार ठोकले. सुवेद पारकरनं ७५, तर अथर्व अंकोलेकरनं नाबाद ३५ धावा केल्या.

ब गटात महाराष्ट्र आणि गोवा यांच्यात काल पुण्यात सुरु झालेल्या सामन्यात शेवटची बातमी हाती आले तेव्हा महाराष्ट्रानं ६ गडी गमावून २१६ धावा केल्या होत्या.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला दूसरा सामना आज रायपूर इथं होणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला आहे.  सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये, काल रात्री वडोदऱ्यात झालेल्या लीग-स्टेज सामन्यात गुजरात जायंट्सनं, यूपी वॉरियर्जवर ४५ धावांनी विजय मिळवला. गुजरात जायंट्सनं दिलेलं १५४ धावांचं लक्ष्य पार करताना यूपी वॉरियर्ज संघ केवळ १०८ धावांचं करू शकला.

//<><><><><>//